| | |
|---|---|
| | **विशेष दिवाणी दावा क्र. १७/२०२४ मधील**<br>**निशाणी क्रमांक १२ खालील आदेश**<br>**(CNR No. MHWS050003212024 )** |

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांचेतर्फे त्यांना लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२) सदरचा अर्ज वाचला. त्यास वादींच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. प्रतिवादी यांच्यातर्फे प्रस्तुतचा अर्ज दिनांक १.७.२०२५ रोजी दिलेला आहे व त्याच दिवशी वादींच्या विधीज्ञांनी प्रस्तुतच्या अर्जावर त्यांचे म्हणणे दिलेले आहे. प्रस्तुतचा अर्ज दिनांक ३१.७.२०२५, २६.९.२०२५ आणि आजरोजी प्रस्तुतच्या अर्जाच्या युक्तीवादासाठी प्रलंबीत आहे. आजरोजी वादी व त्यांचे विधीज्ञ गैरहजर आहेत त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज वादींच्या युक्तीवादाशिवाय गुणदोषावर निकाली काढण्यात येत आहे. प्रतिवादी यांचेतर्फे विधिज्ञ श्री. एम.डी.उंडाळ यांचा युक्तिवाद ऐकला.

३) प्रतिवादी यांचे विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादीस या दाव्याचे समन्स दिनांक १६.१.२०२५ रोजी मिळाल्यानंतर प्रतिवादी हे दिनांक २३.४.२०२५ रोजी या दाव्यात हजर झाले परंतू प्रस्तुतचा दावा मध्यस्थीसाठी प्रलंबीत असल्यामुळे प्रतिवादीस विहित मुदतीत त्यांचा लेखी जबाब दाखल करता आला नाही. त्यामुळे प्रतिवादीस त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास २ महिने १५ दिवसांचा विलंब झाला आहे त्यामुळे तो झालेला विलंब माफ करण्यात यावा आणि प्रस्तुतच्या अर्जासोबत प्रतिवादी यांनी त्यांचा दाखल केलेला जबाब/ लेखी म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे.

४) याउलट वादी यांच्या विधीज्ञांनी असे म्हणणे दिले आहे की, प्रतिवादीने कायदेशीर मुदतीत त्यांचा लेखी जबाब दाखल केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादीच्या प्रस्तुतच्या अर्जास वादींची हरकत आहे.

५) दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ मधील आदेश ८ नियम १ नुसार दाव्याचे

समन्स मिळाल्यापासून जास्तीत जास्त ९० दिवसांच्या आत प्रतिवादीने त्यांचा लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे. या दाव्याचे समन्स प्रतिवादी यांना निशाणी क्र.८ नुसार दिनांक १६.१.२०२५ रोजी मिळालेले आहे आणि प्रतिवादी यांचेतर्फे प्रस्तुतचा अर्ज दिनांक १.७.२०२५ रोजी दिलेला आहे. उपरोक्त दोन्ही तारखा विचारात घेतल्या तर प्रतिवादीस त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास २ महिने १५ दिवसांचा विलंब झालेला आहे असे दिसून येते.

६) हे सर्वज्ञात आहे की, कोणताही दावा गुणदोषावर निकाली निघणे आवश्यक आहे. त्यासाठी दोन्हीही पक्षकारांना पुरेशी संधी मिळणे गरजेचे आहे. वादींनी प्रस्तुतचा दावा वाटणीसाठी दाखल केलेला आहे. या परिस्थितीत, प्रतिवादीचा लेखी जबाब अभिलेखावर आला तर प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली करण्यास तो उपयुक्त ठरु शकतो. या परिस्थितीत प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद विचारात घेतला तर प्रस्तुतचा दावा मध्यस्थीसाठी प्रलंबीत असल्यामुळे प्रतिवादी कायदेशीर मुदतीत त्याचा लेखी जबाब दाखल करु शकला नाही, या युक्तीवादात काही तथ्य दिसून येत नाही. तसेच झालेला विलंब काही खर्च आकारुन माफ करता येवू शकतो. त्यामुळे उपरोक्त सर्व परिस्थिती विचारात घेऊन नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने व प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली निघण्यासाठी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## आदेश

१] प्रस्तुतचा अर्ज नि. १२ हा मंजूर करण्यात येत आहे. तसेच प्रतिवादीस त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास झालेला २ महिने १५ दिवसांचा विलंब रक्कम रुपये ३०००/– च्या खर्चावर माफ करण्यात येत आहे.

२] प्रतिवादीने उपरोक्त नुसारची खर्चाची रक्कम वादींना दिल्यानंतरच प्रतिवादीचा लेखी जबाब अभिलेखावर घेण्यात येईल.

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2025.11.18 16:05:17 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

स्थळ :मंगरुळपीर
दिनांक : १८/११/२०२५.

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | C.R.Gadge |
| Name of Court | : | Shri. D. B. Hambire,<br>Civil Judge Senior Division,<br>Mangrulpir. |
| Date of Decision | : | 18.11.2025 |
| Order signed by the P.O. on | : | 18.11.2025 |
| Order Uploaded on | : | 18.11.2025 |